सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

डिसेंबर-२०२२

वर्ष -४, अंक-२

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, गोखले नगर, पुणे - ४११०१६

## सेवक संघाचे नोंदणीकृत कार्यालयाचे स्थलांतर

सेवक संघाचे नोंदणीकृत कार्यालय अनेक वर्षापासून विश्वस्त श्री. वसंत जोशी यांच्या निवासस्थानी, ब-८, सारसनगर, शुक्रवार पेठ पुणे-२ येथे कार्यरत होते. त्यांच्या निवास स्थानाच्या इमारतीचे नूतनीकरण गेल्यावर्षी सुरू करण्यात आल्याने सदर संघाचे कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात सेवक संघाचे माजी कार्यकारी अध्यक्ष श्री. विठ्ठल पत्की यांच्या निवासस्थानी, यशोपर्व संत एकनाथ नगर-१, बिबवेवाडी, पुणे ३७ येथे हलविण्यात आले होते. तथापि आता सेवक संघाच्या कार्यकारी समितीच्या प्रयत्नातून सेवक संघाच्या कार्यालयासाठी 'वनभवन' गोखले नगर, पुणे-१६ येथे व्यवस्था उपलब्ध झाली आहे. डिसेंबर -२२ च्या कार्यकारी समितीच्या मासिक सभेमध्ये सदर कार्यालयास विधिवत मान्यता देण्यात येणार असून पत्ता बदलाची नोंद मंजूर करण्यात येत आहे व यापुढे सेवक संघाच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता वन ग्रंथालय, दुसरा मजला वनभवन, गोखले नगर पुणे ४११०१६ असा राहील. सर्वांनी याची नोंद घ्यावी.

येथे नमूद करणे प्रसंगवत राहील की, पूर्वी सेवक संघाचे कार्यालय स्वारगेट येथील नवीन पीएमटी इमारतीतील संशोधन विभागाच्या ग्रंथालयात अनेक वर्ष कार्यरत होते. तथापि काही वर्षांपूर्वीच ते कार्यालय वनभवन इमारतीत हलवण्यात आल्याने सेवक संघाचे कार्यालय हे श्री वसंत जोशी यांच्या निवासस्थानी हलविण्यात आले होते. सेवक संघासाठी श्री वसंत जोशी व श्री. विठ्ठल पत्की यांच्या या सेवाभावी योगदानाबद्दल सेवक संघ कायम ऋणी राहील.

## सेवक संघाची सन २०२१-२२ ची आमसभा अमरावती येथे होणार

दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी, अमरावती येथील प्रबोधिनीत सेवक संघाची आमसभा होत आहे. शाखा प्रमुखांनी कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची नावे कळवावी अशी विनंती अमरावती शाखेने केलीआहे.

### कार्यक्रमाची रूपरेषा.

**दिनांक २० जानेवारी**

(१)सकाळी १०.०० ते १०.३० - पदाधिकारी परिचय व स्वागत.

(२) १०.३० ते १०.४५ - प्रास्ताविक - कार्यकारी अध्यक्ष -संघाची वाटचाल व नवीन संधी

(३) १०.४५ ते ११.१५ - सन २१-२२ खर्च मंजुरी व आर्थिक विश्लेषण - सचिव

(४) ११.१५ ते ११.३० - शाखा कार्य अहवाल २०२१-२२ - अमरावती, धुळे, पुणे, औरंगाबाद, नागपुर, चंद्रपूर

(५) ११.३० ते १२.१५ - सेवक संघ कार्य, जबाबदारी,पदाधिकारी निवड प्रक्रिया, शाखा पुनरुज्जीवन न होण्याची कारणे व त्यावर उपाय योजना, ठरविलेल्या उदिष्टपैकी किती व कोणते उद्दिष्ट साध्य झाले व जी उद्दिष्ट साध्य झाले नाही त्याची कारणे व त्यावरील उपाय योजना, यावर मंथन

(६) १२.१५ ते १३.०० -भोजन

(७) १३.०० ते १४.०० - दुपारचा कार्यक्रम - स्थानिक निवृत्त वन अधिकारी व कर्मचारी आणि स्थानिक वन संरक्षक, क्षेत्र संचालक मेळघाट, उप वन संरक्षक, आयुक्त, अमरावती, जि. प. मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी, कृषी अधीक्षक. पाहुण्यांचे स्वागत, परिचय व सेवक स्मृतिचिन्ह आणि औषधी वनस्पती प्रदान करणे. - संचालन श्री. मिलिंद तोरो.

(८) १४.१५ ते १५.०० - सेवक संघ महाराष्ट्र व अमरावती शाखेचे कार्य परिचय - फोटो display सह. अमरावती शाखा

सहअध्यक्ष श्री. संजय जगताप

(९) १५.०० ते १५.१५ -अध्यक्ष, श्री. शिरीष अस्थाना यांचे सेवक संघ महाराष्ट्र, वाटचाल बाबत संबोधन.

(१०) १५.१५ ते १५.३० - विशिष्ट व्यक्ती, संस्था यांचे विशिष्ट वन कार्याबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देवून सन्मान.

(११) १५.३० ते १६.०० -चहापान

(१२) १६.०० ते १६.२५ - विशिष्ट विषयावर २ तज्ञाचे संबोधन

(१३) १६.२५ ते १७.२५ - मान्यवरांचे संबोधन

(१४) १७.२५ ते १८.०० - आभार प्रदर्शन - सचिव अमरावती शाखा

(१५) १८.०० ते १८.१०- डीप टी.

**दिनांक २१.१.२३** रोजी मेळघाट भ्रमंती करिता इच्छूक सेवक सदस्य यांना वाहन व भोजनाची व्यवस्था करुन देण्यात येईल. (वैयक्तिक खर्चाने)

रेल्वेने येणाऱ्या सदस्य करिता दि.२०.१.२३ रोजी बडनेरा रेल्वे स्टेशन येथे वाहन उपलब्ध करून देण्यात येईल.

## मु. का. अ. महा-कॅम्पा यांचेशी मूल्यांकन कामी समझोता संपन्न

सेवक संघाचे जेष्ठ सदस्य व अनेक कामांचे समन्वयक, मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या प्रयत्नातून राज्यातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्र उपचार अंतर्गत रोपवने - ६२९हे. २८ स्थळे, सामाजिक वनीकरण विभाग रस्ता दुतर्फा

रोपवने- ५२५ किमी. १७४ स्थळे , मृद-जल संधारण कामे - ९९ चे मुल्यांकनासाठी मु.का.अ. महा-कॅम्पा,नागपूर यांचेशी श्री. एस. के. गवळी, उपाध्यक्ष, सेवक संघ, महाराष्ट्र, समझोता अभिलेख स्वाक्षरीत केला आहे. मूल्यांकन शुल्क रक्कम रु. ९.८६ लाख आहे. मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या देखरेखीत एस. के. गवळी, जे.ए. पाटील, ए.एस. खुणे, एम.एस. पाटोळे, आर.जे.राणे, आर. एम. शास्त्री , एस.जी. पुराणिक, पी.ए. सुतळे, विवेक डावरे, बी. व्ही. सेलूकर, बी. आर. छल्लारे, बी. बी. जोमीवाले, पी.के. कुलकर्णी, एन. आर. निकम, जी.के. निकम, उमेश धोपेश्वरकर, आर.टी. मोरे, विजय खनके, एस. ए. बत्तुलवार हे मुल्यांकन काम करत आहेत. त्यास सुरूवात झाली असून ते २२ जानेवारी २३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याकामी एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग इंस्टीट्यूट, पुणे यांनी विकसित केलेली संगणकीय प्रणालीचा वापर केला जात आहे. त्यासंबंधात गुगल मीट घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. मुल्यांकन कामाची माहिती ऑनलाईन प्राप्त करण्यात येईल व त्याचे संकलन, पृथ्वकरण, निष्कर्ष संगणकीय प्रणालीव्दारा करण्यात येईल.

## सा.व. विभाग कामांचे मुल्यांकन

बांधावरील लागवड आणि गट लागवड मुल्यांकनासंबंधी सा. व. विभागाशी श्री. पत्की सर वाटाघाटी करीत असून त्यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत जसे की, जिल्हावार लाभार्थिंची संख्या दिलेली आहे, परंतु त्यातील किती टक्के करावयाची आहे हे नमूद केलेले नाही.

लाभार्थींची निवड मूल्यांकनासाठी बांधावर लागवड केलेले आणि गट लागवड केलेले लाभार्थी यांची तालुकावार आणि गाववार नावा -सहित यादी दिलेली नाही.

हा तपशील प्राप्त झाल्यानंतर मूल्यांकनाचे दरपत्रक तयार करणे शक्य होईल, अशी संपूर्ण माहीती पाठविणेची विनंती केली आहे. बहुतेक जास्त मान्सून प्रदेशातील कामे सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात आणि कमी मान्सून प्रदेशातील कामे जालना जिल्ह्यात आहेत. या जिल्ह्यात दोन तालुक्यात मूल्यांकन केल्यास, कमीत कमी खर्चात होईल.

## धुळे शाखा विशेष उपक्रम

### नंदुरबार वन विभाग सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत अपडेट ......

उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग यांचेकडून प्रायोगिक तत्वावर एकूण ५ गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे कामाची प्रगती खालील प्रमाणे आहे. तोरणमाळ, बिलमांजरे, असली, वाघाळे या ४ गावांचे व्यवस्थापन आराखडे जिल्हा स्तरीय समितीची मंजूरी घेण्यासाठी उप वन संरक्षक, नंदूरबार यांच्याकडे सादर करणेत आले आहेत. नवानगर या गावासाठी दिलेल्या वन हक्क जमिनी संदर्भात स्थानिकांचे आक्षेप असून पत्राने त्याबाबत उपवन संरक्षक यांना अवगत केले आहे.

## निधन वार्ता

श्री जब्बार खान यांचे दि. १-१२-२२ रोजी निधन झाले. ते सेवक संघाचे संस्थापक सदस्य होते. ते अतिशय शांत, संयमी स्वभावाचे होते.

कै.एम.ए.बोडस यांचे देखील निधन झाले.

त्यांच्या आत्म्यास सद्गती प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

## सेवक संघाचे मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या बैठकीचा वृत्तांत

डिसेंबर महिन्यात मंगळवार दि.६-१२-२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. बैठक गुगल मीट ॲपव्दारा झाली. बैठकीची विषयसूची पुढीलप्रमाणे होती.

१.पाणलोट उपचार योजना व सामाजिक वनीकरण विभाग अंतर्गत रस्त्यांचे दुतर्फा केलेल्या रोपवनांचे मूल्यांकनाची सद्यस्थिती व नियोजन- श्री. गवळी

२.म. ग्रा. रो. ह. यो. द्वारा सामाजिक वनीकरण यंत्रणेने केलेल्या रोपवन कामांचे मूल्यांकनासाठी दरपत्रके प्राप्त करणे बाबत- श्री.पत्की

३.जानेवारी २०२३ मधील सेवक संघाच्या वार्षिक आमसभेची पूर्वतयारी व खर्चाचा अंदाज- श्री. जगताप.

४.सेवकच्या नवीन कार्यकारणीची निवड पध्दती व प्रस्ताव मागविणे बाबत मार्गदर्शन-श्री.अस्थाना.

५.वन प्रशिक्षण संस्था,पाल व्यवस्थापनाबाबत चर्चा-श्री.गवळी.

६सेवकचे नवीन आजीवन सदस्य नोंदणीची प्रगती व नियोजन-श्री.मदन कुलकर्णी.

७.कै.एम.ए.बोडस आणि पै.जब्बार खान यांना श्रध्दांजली अर्पण करणे.

८.ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

डॉ. शेषराव पाटील यांच्या "सृष्टीचे जीवन गाणे" या कविता संग्रहातून

घायपात माय माझी,
तिनेच मला सांभाळले
लहान असताना
जनावरांच्या पायापासुनी वाचवले
थोडं मोठं झाल्यावर
पदराखाली घेतले
शेळ्यांच्या तोंडातून
तिनेच मला वाचवले
पाजले तिनेच मला
सांभाळलेले पाणी
रखरखीत उन्हात
तिनेच पांघरून घातले
घेतले कवेत मला
कुणाला तोडून न दिले
घायपात माझी माय
तिने मला सांभाळले
घायपात करती
बाळरोपाचे संरक्षण
म्हणूनच केले पाहिजे
त्याचे संवर्धन

**नूतन वर्ष २०२३ च्या सेवक संघाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांना हार्दिक शुभेच्छा !!**

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र,पुणे
संपादन - एस. के. गवळी